
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## महाराष्ट्र शासन

# स्तनाचा कर्करोग



### धोक्याची कारणे

- वाढते वय
- स्तनाच्या कर्करोगाचा कौटुंबिक इतिहास
- मासिक पाळी लवकर येणे
- उशीरा रजोनिवृत्ती
- ३० वर्षांनंतर पहिली गर्भधारणा
- मुले नसणे
- ज्या महिलांनी आपल्या मुलांना स्तनपान दिले नाही
- हॉर्मोनल ट्रीटमेंट
- लठ्ठपणा

### लक्षणे

- स्तनात गाठ
- स्तनाग्रातून रक्तस्राव
- स्तनाग्रामध्ये बदल
- स्तनाचा आकार किंवा स्वरूपात बदल
- स्तनाच्या त्वचेत बदल
- स्तनाच्या किंवा काखेच्या भागात वेदना किंवा अस्वस्थता
- काखेतील गाठ किंवा सूज

### प्रतिबंधात्मक उपाययोजना

- ३० वर्षावरील सर्व महिलांनी महिन्यातून एकदा (मासिक पाळीच्या एक आठवड्या नंतर) स्वतः स्तन तपासणी करावी.
- तसेच वर्षातून एकदा आरोग्य सेविके कडून स्तनाची तपासणी करून घ्यावी.
- स्तनाच्या कर्करोगाची लक्षणे आढळल्यास ए.एन.एम./आशा अथवा नजीकच्या आरोग्य केंद्राशी त्वरित संपर्क साधावा.
- राज्यात सर्व उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय येथे स्तनाची तपासणी मोफत केली जाते.

कर्करोग विषयक माहिती पुस्तिका बघण्यासाठी QR कोड स्कॅन करा

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

# गर्भाशयमुख कर्करोग

## धोक्याची कारणे

- ह्यूमन पॅपिलोमा विषाणू संक्रमण
- एकापेक्षा अधिक पुरुषांसोबत लैंगिक संबंध
- अधिक वेळा गर्भधारणा
- कमी वयात बाळंतपण
- अनुवंशिकता

## लक्षणे

- मासिक पाळी नसताना रक्तस्त्राव होणे
- लैंगिक संबंधा पश्चात रक्तस्त्राव होणे
- महिलांमध्ये रजोनिवृत्ती नंतर रक्तस्त्राव होणे
- ओटी पोटात दुखणे
- लघवी करताना त्रास होणे / दुखणे

## प्रतिबंधात्मक उपाययोजना

- 30 वर्षावरील सर्व महिलांनी नियमित गर्भाशयमुख कर्करोगाची चाचणी करून घ्यावी
- गर्भाशयमुख कर्करोगाची लक्षणे असल्यास ए एन एम/आशा अथवा नजीकच्या आरोग्य केंद्राशी त्वरित संपर्क साधावा.
- राज्यात सर्व उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय येथे व्ही आय ए / पॅप स्मियर द्वारे मोफत तपासणी केली जाते
- वैयक्तिक स्वच्छतेची काळजी घेणे
- एच पी व्ही संसर्गाच्या संपर्क आणि अधिग्रहणा पूर्वी ९ ते १४ वर्षांच्या मुलींचे ह्यूमन पॅपिलोमा लसी द्वारे लसीकरण करण्यात यावे

कर्करोग विषयक माहिती पुस्तिका बघण्यासाठी QR कोड स्कॅन करा